मफुकृवि ई वार्ता
जून २०२२

वर्ष :२, अंक क्रं. : १८, जून, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## खरीप हंगामाच्या विभागीय बैठकीचे आयोजन





**दि. ८ जून, २०२२.** पुणे येथील पशूसंवर्धन आयुक्तालयाच्या कामधेनू सभागृहामध्ये सन २०२२ खरीप हंगामासाठीची विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी कृषि संशोधनात बदल घडत असल्याने सांगितले आणि आज महत्वपूर्ण वाटणारी पिके किंवा तंत्रज्ञान उद्या कालबाह्य होऊ शकते असे ते म्हणाले. तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होत असताना देखील कृषिच्या ज्या क्षेत्रामध्ये आपण स्वयंपूर्णता गाठली आहे ती अबाधित राखत, आपण अद्याप स्वयंपूर्ण नसलेल्या खाद्यतेल, कडधान्ये याबाबत भरारी घेणे गरजेचे आहे. केवळ हरित किंवा धवलक्रांती नाही तर कृषि क्षेत्रामध्ये सप्तरंगी इंद्रधनुषीक्रांती आणणे क्रमप्राप्त आहे व हे कृषि विद्यापीठे व शासनाचे कृषि व इतर संलग्न विभागांनी समन्वयाने काम केल्याने निश्चित शक्य होईल असे ते म्हणाले. राज्याच्या कृषि विभागाचे वतीने कृषि विद्यापिठांना संशोधन, प्रयोग व विस्तार अशा सर्वच बाबतीत संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन राज्याचे कृषि आयुक्त श्री. धीरजकुमार यांनी दिले. कृषि संशोधन आणि विस्तार ही शेतकऱ्यांच्या विकासाच्या गाडीची दोन चाके आहेत असे राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त श्री. सचिंद्र प्रताप सिंह म्हणाले. कार्यक्रमादरम्यान संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांनी विद्यापीठाने मागील वर्षात प्रसारित केलेले पिकांचे विविध वाण, यंत्रे, पीक उत्पादन वाढ व पीक संरक्षण समीकरणे, विविध संशोधन शिफारशी व विस्तार कार्याचा आढावा सादर केला. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पुणे, कोल्हापूर व नाशिक कृषि विभागांचे कृषि सहसंचालक रफिक नाईकवाडी, बसवराज बिराजदार व विवेक सोनावणे यांनी त्यांच्या विभागांचा अहवाल सादर केला. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्ह्यांचा अहवाल सादर केला. यावेळी डॉ. मिलिंद देशमुख व डॉ. नंदकुमार भुते यांनी अनुक्रमे सोयाबीन पीक उत्पादन तंत्रज्ञान व खरीप पिकातील कीड व रोग व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. या वेळी कृषि अधिकारी व शास्त्रज्ञ यांचा कृषि तंत्रज्ञान प्रत्याभरण यावर सुसंवाद झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विनय सुपे, सहयोगी संशोधन संचालक, गणेशखिंड याने केले. सूत्रसंचालन डॉ. मोहन शेटे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. डी.बी. लाड यांनी केले. या बैठकीस कृषि विभागाचे संचालक, सहयोगी अधिष्ठाता, कृषि सहसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी, विद्यापीठ शास्त्रज्ञ, कृषि विज्ञान केंद्रे व कृषि विभागाचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वर्ष :२, अंक क्रं. : १८, जून, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## श्री. नितीन गायकवाड व श्री. अमित पडोळ हे आहेत जून महिन्याचे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे आयडॉल्स




**दि. १ जून, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या संकल्पनेतून विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्रगतशील शेतकरी व महात्मा फुले कृषि विद्यापीठात पदवी घेतलेले यशस्वी कृषि उद्योजक यांचा परिचय समस्त शेतकरी वर्गाला आणि विद्यार्थ्यांना व्हावा या उद्देशाने कुलगुरु डॉ. पाटील यांनी नविन संकल्पना राबविली आहे. यामध्ये दर महिन्याला एक प्रगतशील शेतकरी व एक कृषि पदविचा कृषि उद्योजक यांच्या कार्याविषयी माहिती असलेला फलक विद्यापीठ प्रवेशद्वार, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राच्या दर्शनी भागात तसेच विद्यार्थी वसतीगृहाचा दर्शनी भागात या ठिकाणी लावण्यात येतो तसेच विद्यापीठाच्या दहा जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्रातील कृषि महाविद्यालये, संशोधन केंद्रे आणि कृषि विज्ञान केंद्रे येथील प्रवेशद्वाराजवळ लावण्यात येतो जेणेकरुन संबंधीत प्रगतशील शेतकरी व कृषि उद्योजक यांच्या कार्याचा परिचय विद्यापीठाला आणि कृषि महाविद्यालयांना, कृषि संशोधन केंद्रांना व कृषि विज्ञान केंद्राना भेट देण्यासाठी येणाऱ्या शेतकरी, अधिकारी व विद्यार्थ्यांना होतो. तसेच या व्यक्तिंचा आदर्श घेऊन तरुण शेतकरी व पदवीधरांना प्रेरणा मिळते. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व कृषि महाविद्यालये, कृषि संशोधन केंद्रे, कृषि तंत्र विद्यालये यांच्या दर्शनीय क्षेत्रात ही आयडॉल्स् प्रत्येक महिन्याला प्रदर्शीत करण्यात येतात.

जून २०२२ या महिन्याकरीता शेतकरी आयडॉल म्हणुन चांदखेड, ता. मावळ, जि. पुणे येथील श्री. नितीन गायकवाड व कृषि उद्योजक म्हणुन कोल्हापूर कृषि महाविद्यालयातून बी.एस्सी (कृषि) व पुणे कृषि महाविद्यालयावून ए.बी.एम. चे शिक्षण घेतलेले नाशिक जिल्ह्यातील श्री. अमित पडोळ यांचा समावेश आहे. श्री. नितीन गायकवाड यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने प्रसारीत केलेल्या भाताच्या फुल समृध्दी या वाणाचे विक्रमी उत्पादन घेवून कृषि विभागाने घेतलेल्या पीक स्पर्धेत मावळ तालुका तसेच पुणे जिल्ह्यातून सलग दोन वर्ष प्रथम क्रमांक मिळविला. श्री. गायकवाड यांनी भात पिकामध्ये सुधारीत रोपवाटीका तंत्रज्ञान, चारसूत्री भात लागवड, एकात्मिक खत, किड, रोग व तण व्यवस्थापन भात

पीक मुल्यवर्धन तसेच एकात्मिक शेती पध्दतीचा वापर केला आहे. कृषि उद्योजक असलेले श्री. अमित पडोळ यांचा द्राक्ष बागायतदार ते निर्यातदार असा विलक्षण जीवनप्रवास आहे. त्यांनी द्राक्षाच्या व डाळिंबाच्या नविन जातींवर संशोधन केले असून अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत कोल्ड स्टोरेजची उभारणी केली आहे. तसेच त्यांनी द्राक्ष व डाळिंबाचे गुणवत्तापूर्वक उत्पादन घेतले असून द्राक्षाची निर्यात ते युरोप राष्ट्र व युनायटेड किंगडम या देशात करतात.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व इस्त्राईल पर्यटन मंत्रालय यांच्यामध्ये सामंजस्य करार



**दि. ७ जून, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व इस्त्राईलच्या पर्यटन मंत्रालय यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील होते. यावेळी इस्त्राईल पर्यटन मंत्रालयाचे संचालक श्री. सॅमी याहिया, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता (कृषि) डॉ. प्रमोद रसाळ, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, नियंत्रक डॉ. बापूसाहेब भाकरे, इस्कॉनचे भारतातील मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पुष्करणा, सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, डॉ. श्रीमंत रणपिसे, डॉ. मिलिंद अहिरे, कुलगुरूंचे विशेष कार्यअधिकारी डॉ. महानंद माने, अन्नशास्त्र विभाग प्रमुख डॉ. उत्तम चव्हाण व कुलगुरूंचे तंत्र अधिकारी डॉ. पवन कुलवाल उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले की, या सामंजस्य करारामुळे विद्यापीठातील विद्यार्थी तसेच प्राध्यापकांना अनुभवात्मक शिक्षणाच्या माध्यमातून इस्त्राईल या देशातील कृषि क्षेत्रात केलेल्या प्रगत तंत्रज्ञानाचा फायदा होणार आहे. इस्त्राईल देशात पावसाचे प्रमाण अत्यंत कमी आहे तसेच एकूण क्षेत्रफळाच्या २० टक्के क्षेत्रावर शेती केली जाते. भारतामध्ये अन्नधान्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे इस्त्राईल सारख्या देशांना निर्यातीसाठी चालना मिळू शकेल.

यावेळी श्री. सॅमी याहिया यांनी इस्त्राईल देशात होत असलेल्या अतिप्रगत इंजिनिअरिंगच्या तंत्रज्ञान, कृषि क्षेत्रातील स्वयंचलन सेन्सर्स व नियंत्रण पद्धती, जैविक कीडनाशके याबद्दल माहिती दिली. डॉ. पुष्करणा यांनी शिक्षणामध्ये अनुभवात्मक शिक्षण महत्त्वाचे असल्याचे सांगितले तसेच त्यांनी इस्त्राईलमधील प्रगत तंत्रज्ञानाची माहिती दिली. कार्यक्रमाचे स्वागत तसेच संशोधन व विस्तार कार्याचा आढावा डॉ. शरद गडाख यांनी सादर केला. डॉ. प्रमोद रसाळ यांनी विद्यापीठाच्या शैक्षणिक उपक्रमांविषयी माहिती दिली. या सामंजस्य करारांतर्गत विद्यापीठातील विविध शाखेतील २० ते ५० विद्यार्थी ७ ते १० दिवसांच्या कालावधीसाठी अनुभवावर आधारित शिक्षण घेण्यासाठी इस्त्राईल देशात जाऊ शकणार आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर आभार डॉ. प्रमोद रसाळ यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील प्राध्यापक तसेच विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

## पुणे कृषि महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा






**दि. २१ जून २०२२.** योग अभ्यासामध्ये निरंतरता हवी. योग प्राणायम यांचा सराव निरंतर आणि यथाशक्ती करत राहिल्याने आरोग्यास अनेक लाभ होतात आणि मानवी वृत्तीमध्ये विनम्रता येते असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. कृषि महाविद्यालय, पुणे येथे ८ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग अभ्यास करण्यासाठी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. मागील दोन वर्षे कोरोना महामारीमुळे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त कोणतेही मोठे सार्वजनिक कार्यक्रम झाले नव्हते. परंतु या वर्षी ते शक्य झाले आहे व त्यामुळे केवळ आजच्या दिवशी नव्हे तर सर्वांनी नियमितपणे योग अभ्यास करून संयुक्त राष्ट्र संघाने या वर्षीच्या योग दिनास घालून दिलेली मानवतेसाठी योग हि संकल्पना सार्थक ठरवावी असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले. यावेळी सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासळकर उपस्थित होते. सदर कार्यक्रमास कृषि महाविद्यालय पुणे येथील विद्यार्थी–विद्यार्थिनी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत योगा विषयावर आधारित कविता लेखन, निबंध लेखन, पोस्टर (भित्तीपत्रके) स्पर्धा, घोषवाक्य लेखन आणि योगासने अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धामध्ये विजेत्या विद्यार्थी–विद्यार्थिनी स्पर्धकांना कुलगुरूंच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि योग दिनाच्या शिष्टाचारानुसार उपस्थितांकडून योगाभ्यास डॉ. मनीषा सोनावणे यांनी करवून घेतले तर डॉ. दीपक सावळे यांनी आभार प्रदर्शन केले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात आठवा आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात साजरा

**दि. २१ जून, २०२२.** योग अभ्यासामुळे जीवन रोगमुक्त होऊन मनाचे स्थैर्य लाभते आणि जीवनात सकारात्मकतेची भावना निर्माण होती. या धकाधकीच्या जीवनात योगचा उपक्रम आपण जीवनभर राबविला पाहिजे. यामुळे जीवन तनावमुक्त होऊन निरोगी जीवन जगणे शक्य होईल असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना, डॉ. आण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, पदव्युत्तर महाविद्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हळगाव आणि सावित्रिबाई फुले प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्तरित्या आयोजीत आठव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मार्गदर्शन करताना अधिष्ठाता डॉ. रसाळ बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन अहमदनगर येथील निवृत्त प्राध्यापक व योग शिक्षक श्रीधर धास उपस्थित होते. याप्रसंगी सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, डॉ. श्रीमंत रणपिसे,





डॉ. मिलिंद अहिरे, उद्यानविद्या विभागाचे डॉ. भगवान ढाकरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक व विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहाण, क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड, विद्यालयाच्या मुख्याध्यापीका सौ. आशा धनवटे, श्री. बाळासाहेब खेत्री आणि प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. पंडित खर्डे उपस्थित होते.

योगशिक्षक प्रा. श्रीधर धास मार्गदर्शन करतांना म्हणाले की आपल्या प्रत्येकामध्ये ज्ञान हे स्थित असते, फक्त त्यावरील आवरण काढण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. शिक्षणामध्ये मनाच्या एकाग्रतेची आवश्यकता असते. मन एकाग्र होण्यासाठी योग अभ्यास नितांत गरजेचा आहे. यावेळी प्रा. धास व श्री. देवेंद्र वंजारे यांनी उपस्थितांकडून वेगवेगळ्या प्रकारची २१ आसने व ७ प्रकारचे प्राणायाम करुन घेतले. डॉ. महावीरसिंग चौहाण यांनी प्रास्ताविक, स्वागत व प्रमुख पाहुण्यांची ओळख करुन दिली. प्रा. जितेंद्र मेटकर यांनी आभार मानले. यावेळी विद्यापीठातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फुले ॲग्रोमार्ट ऑनलाईन पोर्टलद्वारे कांदा बियाणे विक्री सुरु



**दि. १४ जून, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेले कांद्याचे फुले समर्थ आणि बसवंत ७८० या वाणांना शेतकऱ्यांची प्रथम पसंती असते. कृषि विद्यापीठाच्या बियाण्यांवर शेतकऱ्यांचा विश्वास आहे. शेतकऱ्यांना विनाकष्ट व त्यांच्या जिल्ह्यामध्ये किंवा जवळील जिल्ह्यामध्ये बियाणे उपलब्ध व्हावे म्हणुन विद्यापीठ कांदा बियाणे फुले ॲग्रोमार्ट

पोर्टलद्वारे ऑनलाईन विक्री करत आहे असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या खरीप कांद्याच्या बियाण्यांची विक्रीची नोंद ऑनलाईन पोर्टलद्वारे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या हस्ते सुरु करण्यात आली. याप्रसंगी संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, बियाणे विभाग प्रमुख डॉ. आनंद सोळंके, उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. श्रीमंत रणपिसे उपस्थित होते. यावेळी डॉ. गडाख म्हणाले या वर्षी कांदा पिकाचे फुले समर्थ या वाणाचे १०,५३३ किलो आणि बसवंत ७८० या वाणाचे २२६ किलो बियाणे ऑनलाईन पध्दतीने विक्रीसाठी उपलब्ध आहे. हे बियाणे ज्या शेतकऱ्यांनी ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी करुन पैसे भरलेले असतील अशा शेतकऱ्यांना हे बियाणे त्यांनी दिलेल्या पर्यायानुसार कृषि विज्ञान केंद्र, धुळे, कृषि विज्ञान केंद्र, बोरगांव, पिंपळगाव बसवंत संशोधन केंद्र आणि राहुरी कृषि विद्यापीठाच्या विक्री केंद्रावर उपलब्ध होईल. पुढील वर्षी ५० टन कांदा बियाणे उत्पादनाचे नियोजन केलेले आहे. तसेच विविध फळपिकांचे २१ लाख रोपांचे पुढील वर्षासाठी नियोजन आहे. याप्रसंगी डॉ. सोळंके म्हणाले ज्या शेतकऱ्यांनी कांदा बियाणेसाठी फुले ॲग्रोमार्ट पोर्टलवर नोंदणी केलेली आहे व नोंदणीवेळी जे कागदपत्रे पोर्टलवर जमा केले आहे त्या कागदपत्रांची झेरॉक्स आणि पैसे भरल्याची पावती बियाणे घेतांना विक्री केंद्रावर जमा करणे आवश्यक आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बियाणे उत्पादन अधिकारी डॉ. सी.बी साळुंखे यांनी केले. आभार डॉ. ज्ञानेश्वर क्षीरसागर यांनी मानले. या कार्यक्रमाला डॉ. मधुकर भालेकर, डॉ. विजय शेलार, डॉ. सुरेश झांजरे, डॉ. बी.डी. पाटील, डॉ. कैलास गागरे, प्रा. बी.टी. शेटे, डॉ. डी.एस. ठाकरे, डॉ. एस.आर. धोंडे, डॉ. ए.व्ही. सुर्यवंशी, डॉ. आर.बी. माने, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## हाळगाव कृषि महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा



**दि. २१ जून, २०२२.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवअंतर्गत व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. मिलिंद अहिरे अध्यक्षस्थानी होते. या कार्यक्रमाला राहुरी येथील आयुर्वेद महाविद्यालयाच्या योग शिक्षिका सौ. मंजिरी रीसबुड प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी त्या म्हणाल्या की योगाप्रति प्रत्येकाने सजग झाले पाहिजे. धावपळीच्या जीवनामध्ये यश–अपयश तसेच सुख आणि दुःख याकडे पाहण्याचा प्रत्येकाचा दृष्टीकोन वेगवेगळा असतो. त्यासाठी प्रत्येकाने दररोज योग साधना करावी. प्रास्ताविक विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे यांनी केले तर प्रमुख पाहुण्यांची ओळख विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. चारुदत्त चौधरी यांनी करून दिली. कार्यक्रमाला शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांची सोलापूर येथील विभागीय कृषि संशोधन केंद्रास भेट





**दि. २२ जून, २०२२.** कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी सोलापूर येथील विभागीय कृषि संशोधन केंद्रास भेट दिली. सदर भेटी प्रसंगी मा. कुलगुरु यांच्या शुभहस्ते संशोधन केंद्रावर उभारण्यात आलेल्या १५ किलो वॅट क्षमतेच्या सोलार विद्युत निर्मिती प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूरचे प्रमुख शास्त्रज्ञ व सहयोगी संशोधन संचालक डॉ. विजय अमृतसागर, सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसिलदार श्रीमती अंजली कुलकर्णी, कृषि तंत्र विद्यालय, सोलापूरचे प्राचार्य डॉ. जयवंत जाधव हे उपस्थित होते. कुलगुरु डॉ. पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मागील ९० वर्षापासून कोरडवाहु शेतकऱ्यांसाठी या संशोधन केंद्राने केलेल्या भरीव संशोधनाबद्दल सर्व शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले. बदलत्या हवामान परिस्थितीमध्ये कोरडवाहु क्षेत्रामधील संधी आणि आव्हाने यावर मार्गदर्शन केले व पडणाऱ्या पावसाचे जास्तीत जास्त संधारण करून साठवलेल्या पाण्याचा वापर अतिशय कटकसरीने करण्यासाठी आधुनिक सिंचन पद्धतीचा अवलंब करून पाण्याची उत्पादकता वाढवण्यावर भर देण्याविषयी संगितले. कुलगुरु डॉ. पाटील यांनी संशोधन केंद्रावरील प्रकल्प, प्रयोगशाळा तसेच मुळेगाव येथील प्रक्षेत्रावरील प्रायोगिक क्षेत्र, बिजोत्पादन क्षेत्र, गांडूळ खत प्रकल्प, शेततळे या ठिकाणी भेटी देऊन संशोधन केंद्राचे तंत्रज्ञानाचा प्रसार जास्तीत जास्त होण्यासाठी सूचना दिल्या. या प्रसंगी नरोटेवाडी, ता. उत्तर सोलापूर येथे राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय संवेदनक्षम हवामान बदल प्रकल्पातील प्रगतिशील शेतकरी श्री. हमीद कुडले यांचा सत्कार केला. सदर कार्यक्रमप्रसंगी विभागीय कृषि संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ, कर्मचारी, शेतकरी, कृषि निविष्टा विक्रेते प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. डी.व्ही. इंडी व आभार डॉ. सुहास उपाध्ये यांनी केले.

## मोहोळ कृषि विज्ञान केंद्रास कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांची भेट

**दि. २४ जून, २०२२.** मोहोळ येथील कृषि विज्ञान केंद्राला कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी भेट दिली. त्यांनी मोहोळचा विस्तार विषयक कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रम समन्वयक डॉ. तानाजी वळकुंडे यांनी सर्व उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना कृषि विज्ञान केंद्राचा वार्षिक अहवाल सादर केला. नविन हंगामामध्ये येणाऱ्या पिकाविषयी सविस्तर माहिती दिली. डॉ. पाटील यांनी कृषि विज्ञान केंद्र परिसर व कृषि विज्ञान केंद्र प्रक्षेत्राची पाहणी करुन कृषि विज्ञान केंद्राच्या विकासासाठी कार्यरत राहण्यासाठी आवाहन केले. त्यांनी कृषि संशोधन केंद्रालाही भेट दिली. याप्रसंगी सहयोगी संशोधन संचालक डॉ. विजय अमृतसागर, कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.डी. जाधव आणि डॉ. व्ही.आर. पाटील, डॉ. विशाल जाधव, डॉ. शरद जाधव, काजल जाधव, दिनेश क्षीरसागर, डॉ. सूरज मिसाळ, तुषार अहिरे, सुयोग ठाकरे उपस्थित होते.

मफुकृवि ई वार्ता
जून २०२२

वर्ष :२, अंक क्रं. : १८, जून, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## मा. कुलगुरु यांची पुढरपूर कृषि संशोधन केंद्राला भेट




**दि. २३ जून, २०२२.** आधुनिक शेती पीक पध्दतीमध्ये काळानुसार शेतीच्या आरोग्याचा समतोल राखण्यासाठी कडधान्य व तेलबिया पिकांचे लागवडीखालील क्षेत्र वाढविणे काळाची गरज असल्याचे मत कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी कडधान्य व तेलबिया पिके संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र, पंढरपूर येथील भेटीदरम्यान व्यक्त केले. या संशोधन केंद्रावरील प्रसारीत चवळी पिकांचे फुले सोनाली, फुले विठाई, फुले रखुमाई व फुले पंढरी हे चवळी पिकाचे वाण महाराष्ट्रात लागवडीसाठी उपयुक्त असून सदर वाण हे कमी कालावधीत शेतकऱ्यांना जास्तीत जास्त उत्पन्न देणारे असून याची शेतकरीबंधुनी लागवड करणे गरजेचे असल्याचे सांगितले. मा. कुलगुरु यांनी संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्राची पाहणी करुन शेतकऱ्यांच्या बदलत्या हवामानानुसार स्पर्धेच्या युगात शेतकरी टिकून राहण्यासाठी शाश्वत उत्पादनवाढीसाठी संशोधन करण्याच्या सुचना व मार्गदर्शन केले. तसेच संशोधन केंद्राच्या बळकटीकरणासाठी विद्यापीठ स्तरावरुन सर्वतोपरी भरीव मदत करण्याची ग्वाही दिली. यावेळी संशोधन केंद्रावरील प्रक्षेत्रावर काम करणाऱ्या मजूरांच्या अडीअडचणी त्यांनी जाणून घेतल्या. कडधान्य व तेलबिया पिके संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र, पंढरपूरचे प्रभारी अधिकारी डॉ. रमेश भदाणे यांनी संशोधन केंद्राच्या संशोधनविषयक कामांची माहिती दिली. यावेळी सहयोगी संशोधन संचालक डॉ. विजय अमृतसागर, कृषि तंत्र विद्यालय, सोलापूरचे प्राचार्य डॉ. जयवंत जाधव आणि या संशोधन केंद्रावर कार्यरत कर्मचारी उपस्थित होते.

## बुध्दिमंथन कार्यशाळेचे आयोजन

**दि. २४ जून, २०२२.** विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी आपले प्रबंधाचे संशोधन प्रबंधापुरते मर्यादित न ठेवता संशोधनाद्वारे तंत्रज्ञान तसेच डिझाईनचे पेटंट मिळविणे गरजेचे आहे. पेटंट तसेच बौध्दिक मालमत्ता हक्क या विषयी मनामध्ये भिती बाळगू नका. विद्यार्थी व प्राध्यापकांनी आपल्या संशोधनाला पेटंटची जोड दिली तर त्यांच्या संशोधनाचे मुल्य वाढेल या करीता त्यांच्यामध्ये पेटंट संस्कृती आणणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली आणि जागतीक बँक अर्थसहाय्यीत राष्ट्रीय उच्च शिक्षण प्रकल्प अंतर्गत हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्राद्वारे बौध्दिक मालमत्ता हक्क या विषयावरील बुध्दिमंथन कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठात करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. पाटील बोलत होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणुन भारत सरकारच्या मुंबई येथील वाणिज्य आणि उद्योग विभागाचे पेटंट व डिझाईनचे तज्ञ परिक्षक श्री. अतुल खाडे उपस्थित होते. याप्रसंगी संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, कुलगुरुंचे विशेष



कार्याधिकारी डॉ. महानंद माने, कृषि यंत्रे व शक्ती अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे उपस्थित होते. यावेळी तज्ञ परिक्षक श्री. अतुल खाडे मार्गदर्शन करतांना म्हणाले की तुम्ही केलेल्या संशोधनाला मान्यता मिळवून द्यायची असेल तर पेटंट मिळविण्यासाठी प्रयत्न करा. यामुळे तुमच्या संशोधनाला मान्यता मिळून त्यातून तुम्हाला अर्थप्राप्ती होवू शकते. पेटंट मिळविण्यासाठी तुम्ही केलेले संशोधन नाविन्यपूर्ण असायला हवे. जास्तीत जास्त विद्यार्थी तसेच प्राध्यापकांनी त्यांच्या संशोधनाला पेटंट कसे मिळेल हे पाहिले पाहिजे. यावेळी त्यांनी पेटंट कसे फाईल करावे, कॉपीराईट तसेच भौगोलीक इंडिकेशन्स या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. महानंद माने यांनी करुन दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन डॉ. सचिन नलावडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शुभांगी घाडगे यांनी केले. या कार्यक्रमाचे निमंत्रक डॉ. सुनिल गोरंटीवार व डॉ. मुकुंद शिंदे हे होते तर आयोजक सचिव अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. उत्तम चव्हाण हे होते. या कार्यक्रमासाठी सर्व विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि विज्ञान केंद्राची कृती कार्यशाळा संपन्न




**दि. ३० जून, २०२२.** या वर्षी खरीप हंगामाची सुरुवात पुरेशा पावसाने झाली आहे. विद्यापीठाचे तंत्रज्ञान गावातील शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचे महत्वाचे कार्य कृषि विज्ञान केंद्र करत आहे. खरीप हंगाम शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वाचा असून कृषि विज्ञान केंद्रांची कृती कार्यशाळा योग्य वेळी होत आहे. या कृती कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यापीठाचे तंत्रज्ञान जास्तीत

वर्ष :२, अंक क्रं. : १८, जून, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहचले तर शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी निश्चितच फायद्याचे ठरेल असे प्रतिपादन संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ आणि कृषि तंत्रज्ञान अवलंबन संशोधन संस्था, विभाग–८, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील १७ कृषि विज्ञान केंद्रांची एक दिवसीय कृती कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. गडाख बोलत होते. याप्रसंगी कृषि तंत्रज्ञान अवलंबन संशोधन संस्थेचे संचालक डॉ. लाखन सिंग ऑनलाईन उपस्थित होते. यावेळी सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. श्रीमंत रणपिसे, कृषि विस्तार विभागाचे प्राध्यापक डॉ. जी.के. ससाणे उपस्थित होते. यावेळी डॉ. लाखन सिंग म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विविध पिकांमध्ये संशोधन करुन शेतकऱ्यांसाठी मोठे योगदान दिले आहे. कृषि विज्ञान केंद्रांच्या या कृती कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यापीठाचे विविध पिकातील अद्ययावत संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहचते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. पंडित खर्डे यांनी प्रास्ताविक करुन सर्वांचे स्वागत केले. या कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख, विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील एकूण १७ कृषि विज्ञान केंद्रांचे कार्यक्रम समन्वयक उपस्थित होते. डॉ. भगवान देशमुख यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. डॉ. गोकुळ वामन यांनी आभार मानले.

## कृषि परिषदेचे महासंचालक श्री. आर. बी. भागडे यांची कृषि विद्यापीठाला सदिच्छा भेट



**दि. ४ जून, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे नवनियुक्त महासंचालक श्री. आर. बी. भागडे यांनी नुकतीच भेट दिली. यावेळी कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी महासंचालक श्री. भागडे यांनी शास्त्रज्ञांबरोबर संवाद साधला. मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे शिक्षण, संशोधन व विस्तारामध्ये मोठे कार्य आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीमध्ये या कृषि विद्यापीठाचे मोठे योगदान आहे. कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात जेथे मोठी शहरे आहेत तेथे कृषि मॉल सुरु करावे. यामुळे विद्यापीठाच्या महसुल उत्पन्नात वाढ होईल. ऑनलाईन ॲपची निर्मिती करुन विद्यापीठ उत्पादनांची विक्री करावी असे ते म्हणाले. यावेळी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील म्हणाले गुजरात राज्यातील राष्ट्रीय कृषि विकास योजनेतील निधीपैकी तेथील कृषि विद्यापीठांना १५ टक्के निधी दिला जातो. त्याच धरतीवर महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत कृषि विद्यापीठांना संशोधन व विस्तारासाठी निधी मिळावा. विद्यापीठाने शेतकरीभिमुख आणि बदलत्या हावामानात तग धरणारे संशोधन केले आहे आणि होत आहे. विद्यापीठाच्या कुकिजला नुकतेच पेटंट मिळाले असून महाराष्ट्र, गोवा आणि उत्तराखंड येथील राजभवनामध्ये विद्यापीठाचे कुकिज पाठविले जातात. विद्यापीठाच्या बियाणे आणि कास्ट प्रकल्पाला देशपातळीवर

प्रथम क्रमांकाने गौरविण्यात आले आहे. यावेळी कुलगुरुंनी विद्यापीठाच्या प्रमुख उपलब्धींची माहिती दिली. याप्रसंगी संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांनी विद्यापीठाच्या संशोधन व विस्तार कार्याचे सादरीकरण केले. अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी विद्यापीठाच्या कृषि शिक्षणाची माहिती दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे यांनी केले. याप्रसंगी नियंत्रक डॉ. बापुसाहेब भाकरे, कुलगुरुंचे विशेष कार्याधिकारी डॉ. महानंद माने, सहयोगी अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे, डॉ. मिलिंद अहिरे आणि विविध विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते. उपस्थितांचे आभार डॉ. भगवान देशमुख यांनी मानले.

## डॉ. लाखन सिंह यांची भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम प्रकल्पाला भेट



**दि. १० जून, २०२२.** भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीच्या शेतकरी प्रथम प्रकल्पास अटारी पुणेचे संचालक डॉ. लाखन सिंह व शास्त्रज्ञांनी भेट दिली. यावेळी अटारी, पुणे येथील शास्त्रज्ञ डॉ. तुषार आठरे व डॉ. राजेश टी, प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे, सहसमन्वयक डॉ. भगवान देशमुख, कानडगाव येथील सरपंच श्री मधुकर गागरे व इतर शेतकरी तसेच महिला शेतकरी उपस्थित होते. हा शेतकरी प्रथम प्रकल्प महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

याप्रसंगी डॉ. लाखन सिंह शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की शेतकऱ्यांनी आपले उत्पन्न वाढविण्यासाठी शेतीमध्ये वैविध्यपूर्ण बदल केले पाहिजे. शेतीला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन इत्यादी प्रकारचे व्यवसाय केले पाहिजे. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना छोटे छोटे व्यवसाय सुरू करून द्यावे. विद्यापीठाने विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा अवलंब शेतकऱ्यांनी आपल्या शेतात करुन आपला सर्वांगीण विकास करावा. भेटीदरम्यान कनगर येथील श्री. राजेंद्र वरघुडे यांच्या एकात्मिक शेती पद्धती, शेतमजूर महिला बचत गट यांचा दालमिल प्रकल्प, तांभेरे येथील डाळिंब उत्पादक शेतकरी श्री. गोकुळ मुसमाडे यांच्या डाळिंब बागेस, श्री. ताराचंद गागरे यांच्या परसबागेतील कुक्कुटपालन, कानडगाव येथील श्री. राधाकृष्ण गागरे यांच्या मुक्त गोठ्यास व कानडगाव येथील श्री. मधुकर गागरे यांच्या एकात्मिक शेतीपद्धतीस भेटी दिल्या. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे यांनी केले. प्रगतीशील शेतकरी श्री ताराचंद गागरे व श्री राधाकृष्ण गागरे यांनी आपले मनोगत मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकल्पाचे सहसमन्वयक डॉ. भगवान देशमुख यांनी व आभार प्रदर्शन प्रकल्पाचे वरिष्ठ संशोधन सहयोगी श्री. विजय शेडगे यांनी केले. सदरील प्रकल्पाच्या भेटीचे आयोजन करण्यासाठी प्रकल्प सहाय्यक श्री. किरण मगर व श्री. राहुल कोऱ्हाळे यांनी सहकार्य केले.

## कृषि अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी मिळविला उत्कृष्ट डिझाईनचा पुरस्कार



**दि. १४ जून, २०२२.** डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयातील कृषि अभियांत्रिकी पदवीच्या २५ विद्यार्थ्यांच्या फार्म टायगर्स या चमूने महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी या ठिकाणी झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील एस.ए.ई. इंडिया तिफन-२०२२ या एकदिवसीय स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा उत्कृष्ट डिझाईनचा पुरस्कार मिळविला आहे. या स्पर्धेमध्ये देशभरातून एकुण ३० संघ सहभागी झाले होते. हा पुरस्कार स्वयंचलीत कांदा काढणी यंत्र निर्मितीसाठी मिळाला असून रु. २० हजाराचे रोख रक्कमेचे पारितोषिक मिळाले आहे. पुरस्काराचे वितरण अमरावती येथील जाधव ॲग्रो इंन्डस्ट्रीजचे अध्यक्ष श्री. राजेंद्र जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत विविध सात प्रकारांमध्ये पुरस्कार देण्यात आले. डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेने या प्रकल्पासाठी आर्थिक सहाय्य केले असून डॉ. अवधूत वाळूंज व डॉ. पी.बी. कदम यांनी या प्रकल्पासाठी मार्गदर्शक म्हणून काम पाहिले. कृषि यंत्रे व उर्जा अभियांत्रिकी या विभागामध्ये या प्रकल्पावर काम करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील तसेच महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार व विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## कालवा लाभक्षेत्रामध्ये जलव्यवस्थापनाचे पर्याय या विषयावर व्याख्यानाचे आयोजन



**दि. २१ जून, २०२२.** कालव्याच्या लाभक्षेत्रामधील विकासामुळे धोकादायक दुष्काळ टाळुन आर्थिक विकासाला गति मिळु शकते, तसेच कालव्याच्या विकासाद्वारे पावसावरील अवलंबित्व कमी करता येवू शकते. भुबनेश्वर येथील शेततळे आधारीत सुक्ष्म सिंचन प्रणाली पावसाळ्यानंतरच्या हंगामासाठी वरदान ठरलेली आहे. म्हणून कालवा लाभक्षेत्रात शेततळे आधारीत सुक्ष्म सिंचन प्रणाली काळाची गरज आहे असे प्रतिपादन भुबनेश्वर येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या इंडियन

इन्स्टीट्युट ऑफ वॉटर मॅनेजमेंटचे प्रमुख संशोधक डॉ. आर. के. पांडा यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थानाचे आधुनिक कृषि विज्ञान तंत्रज्ञान प्रकल्पाअंतर्गत कालवा लाभक्षेत्रामध्ये जलव्यवस्थापनाचे पर्याय या विषयावर भुबनेश्वर येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या इंडियन इन्स्टीट्युट ऑफ वॉटर मॅनेजमेंटचे प्रमुख संशोधक डॉ. पांडा यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ होते. यावेळी कृषि अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख आणि कास्ट प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार, आंतरविद्या जलसिंचन व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. महानंद माने, कास्ट प्रकल्पाचे प्रकल्प सहसमन्वयक डॉ. मुकुंद शिंदे आणि मृदा व जलसंधारण विभागाचे प्रमुख आणि नोडल ऑफिसर डॉ. सचिन नांदगुडे, डॉ. सुनिल कदम आणि डॉ. सचिन डिंगरे उपस्थित होते. डॉ. रसाळ म्हणाले कि स्वयंचलीत कालवा सिंचन प्रणालीमुळे पाण्याची बचत होऊन महाराष्ट्रातील अधिकाधिक क्षेत्र सिंचनाखाली आणता येणे शक्य आहे. डॉ. नांदगुडे यांनी स्वागत केले. डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी विद्यार्थ्यांना डिजिटल कृषि तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन केले. आभार प्रदर्शन डॉ. मुकुंद शिंदे तर सुत्रसंचालन डॉ. शुभांगी घाडगे यांनी केले. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणुन इंजि. दत्तात्रय पवार, इंजि. कल्पेश बोरसे आणि इंजि. अभिषेक दातिर यांनी काम पाहिले. या कार्यक्रमासाठी पदव्युत्तर व आचार्य पदवीचे विद्यार्थी उपस्थित होते.

## सातारा जिल्ह्यात कृषि तंत्रज्ञान पारायण उपक्रम संपन्न



**दि. २ जून, २०२२.** सातारा जिल्हयातील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव या केंद्रामार्फत कृषि तंत्रज्ञान पारायण उपक्रम फलटण तालुक्यातील आदर्की बु. या गावात कृषि विभागाच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. या गावाची निवड करताना गावाचा डाटाबेस तयार करण्यात आला. कृषि विभागाच्या सहकार्याने गावातील प्रमुख पिकांची माहिती घेण्यात आली. शेतकऱ्यांच्या शेतीविषयक समस्या जाणून घेतल्या. गावातील पशुपालन, एकात्मिक शेतीपध्दती आणि लघुउद्योग यांची माहिती संकलित करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरवातीला संशोधन केंद्राने प्रामुख्याने ऊस, मका, सोयाबीन, बाजरी, कांदा, टोमॅटो, भाजीपाला आणि फळबागा या पिकाचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी कार्यक्रम आयोजीत केला. लक्ष्य एकरी १०० टन ऊसाचे या विषयावर डॉ. भरत रासकर, ऊस विशेषज्ञ, ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव यांनी मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे पाडेगाव केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे, डॉ. सुभाष घोडके, डॉ. दिपक डामसे, डॉ. सुरेश उबाळे, डॉ. माधवी शेळके, डॉ. किरणकुमार ओंबासे, कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव येथील डॉ. भूषण यादगीरवार या तज्ञांनी आणि कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. शेवटी जिल्हा विस्तार केंद्राचे प्रमुख डॉ. किरणकुमार ओंबासे यांनी सर्वांचे आभार मानले.

## नाशिक जिल्ह्यात मॉडेल व्हिलेज अंतर्गत शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन



**दि. १६ जून, २०२२.** कृषि पारायण व मॉडेल व्हिलेज या उपक्रमांतर्गत नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव निपाणी येथे शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम निफाड येथील कृषि संशोधन केंद्राच्या जिल्हा विस्तार केंद्रामार्फत आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि संशोधन केंद्राचे कवक शास्त्रज्ञ डॉ. बबनराव इल्हे होते. प्रमुख अतिथी म्हणुन पिंपळगाव निपाणीचे सरपंच श्री. शिवाजी खाडे, कृषि संशोधन केंद्राचे डॉ. उदय काचोळे, डॉ. योगेश पाटील, डॉ. भानुदास गमे, प्रा. भालचंद्र म्हस्के, प्रा. संजय चितोडकर, डॉ. प्रमोद बेल्हेकर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. इल्हे यांनी शेतकऱ्यांना रासायनिक निविष्ठांचा वापर कमी करुन त्याऐवजी जैविक कीडनाशके, जीवाणू खतांचा वापर केल्यास उत्पादन खर्च कमी करण्यास व उत्पादनात वाढ होवून पर्यावरण पूरक शेती होण्यास मदत कशी होईल याबाबत मार्गदर्शन केले. तांत्रिक मार्गदर्शनात डॉ. योगेश पाटील यांनी माती परिक्षणाचे महत्व व खरीप पिकांसाठी एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाविषयी माहिती सांगून शेतकऱ्यांना माती परिक्षण करुन घेण्याचे आवाहन केले. पीक रोग शास्त्रज्ञ डॉ. भानुदास गमे यांनी खरीप हंगामातील पिकांसाठी बीज प्रक्रिया व जीवाणू खताचा वापर याचे महत्व सांगून बीज प्रक्रिया करण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करुन दाखविले. प्रा. संजय चितोडकर यांनी सोयाबीन लागवड तंत्रज्ञान, डॉ. प्रमोद बेल्हेकर यांनी मका लागवड तंत्रज्ञान आणि प्रा. भालचंद्र म्हस्के यांनी खरीप हंगामातील पिकांवरील एकात्मिक कीड व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविकात डॉ. योगेश पाटील यांनी मॉडेल व्हिलेज उपक्रमाचा उद्देश व महत्व उपस्थित शेतकरी व महिलांना अवगत करुन दिले. सूत्रसंचालन डॉ. भानुदास गमे तर ज्ञानेश्वर खाडे यांनी आभार मानले. कार्यक्रम आयोजनासाठी निफाड कृषि केंद्राचे डॉ. सुरेश दोडके यांचे मार्गदर्शन लाभले.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे अंतर्गत मॉडेल व्हिलेजसाठी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**दि. २२ जून, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि कृषि विज्ञान केंद्र, धुळे अंतर्गत कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या संकल्पनेतून मॉडेल व्हिलेज प्रकल्पातून केळीपाडा, ता.साक्री, जिल्हा. धुळे या गावामध्ये आयोजीत करण्यात आला. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर उपस्थित होते. यावेळी साक्री येथील पंचायत समिती सदस्या श्रीमती. रुधाताई बीलकुडे, केळीपाडा येथील ग्रामपंचायत सदस्या श्रीमती. रंजूताई वाळवी, कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, उद्यानविद्यावेत्ता प्रा. श्रीधर देसले, डॉ. पंकज पाटील, कु. अमृता राउत, डॉ. अतिश पाटील, डॉ. धनराज चौधरी, पिंपळनेरचे मंडळ कृषि अधिकारी श्री. तानाजी सदगीर, श्री. राहुल पाटील, श्री. वनसिंग देसाई, अध्यक्ष रंगावली शेतकरी गट, केळीपाडा, प्रगतशील शेतकरी,



ग्रामस्थ आदी मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये डॉ. देवकर यांनी मॉडेल व्हिलेजचे महत्व सांगत शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त सेंद्रिय निविष्टांचा वापर करत विषमुक्त शेतीच्या सेंद्रिय शेतीच्या दृष्टीने वाटचाल करणे आवश्यक आहे असे सांगितले. या प्रशिक्षणाचे प्रास्ताविक डॉ. दिनेश नांद्रे यांनी केले. कृषि विभागाच्या योजनांविषयी माहिती यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना देण्यात आली. तांत्रिक मार्गदर्शनामध्ये डॉ. पंकज पाटील यांनी भात, नागली, मका पिकातील एकात्मिक कीड व रोग निदान याविषयी मार्गदर्शन केले. कु. अमृता राऊत यांनी ग्रामस्तरावरील कृषि प्रक्रियेच्या संधी तर डॉ. अतिश पाटील यांनी माती पाणी परीक्षणाचे महत्व अधोरेखित करून मार्गदर्शन केले. डॉ. धनराज चौधरी यांनी पशुपालानातील आहारामध्ये खनिज मिश्रणाचे महत्व सांगत मार्गदर्शन केले. प्रा. श्रीधर देसले यांनी कांदा पिंकाचे लागवड तंत्र याविषयीची माहिती उपस्थितांना दिली. श्री. जगदीश काथेपुरी यांनी सुधारित भात लागवड तंत्रज्ञान, श्री. रोहित कडू यांनी सुधारित भाजीपाला लागवड तंत्रयाविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. धनराज चौधरी यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. रणजीत वळवी यांनी मानले.

## राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन अभ्यासक्रम संपन्न

**दि. २८ जून, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान प्रकल्पांतर्गत हवामान अद्ययावत पाणलोट व्यवस्थापन या विषयावरील तीन आठवड्याचा ऑनलाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रम संपन्न झाला. या तीन आठवड्याच्या ऑनलाईन प्रमाणपत्र प्रशिक्षणासाठी मृदा व जलसंधारण अभियांत्रिकी, कृषि मृदा व रसायनशास्त्र व नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन या क्षेत्रातील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शिक्षण व संशोधन आणि विविध प्रादेशिक केंद्रांतील वेगवेगळे नामवंत प्रशिक्षक लाभले होते. हवामान बदल आणि त्याचा उपलब्ध जमीन आणि जलस्रोतांवर होणारा परिणाम ही जागतिक चिंता आहे. शाश्वत विकास, जैवविविधता संवर्धन आणि हवामानातील बदल कमी करणे आणि त्यांच्याशी जुळवून घेणे यासाठी पाण्याची टंचाई आणि जमिनीचा ऱ्हास ही प्रमुख आव्हाने आहेत. उपलब्ध जमीन आणि जलस्रोतांचे कार्यक्षम आणि प्रभावी व्यवस्थापन त्यामुळे संपूर्ण पाणलोट विकासासाठी, जीवनमान सुधारण्यासाठी आणि अन्नधान्य पुरेशी राखण्यासाठी आवश्यक आहे अशी मते तज्ञांनी मांडली. विविध आव्हाने आणि हवामान बदलाचे पैलू, त्याचे अनुकूलन कमी करणे, हवामान-प्रूफिंग; पाणलोट क्षेत्राच्या विकास आणि व्यवस्थापनामध्ये नियोजन, मॉडेलिंग तंत्र, कमी किमतीच्या आणि हवामान अद्ययावत संरचनांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या विविध यंत्रणा इत्यादी अनेक विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षणाचे निमंत्रक कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुनील गोरंटीवार आणि जी.आय.झेड. चे प्रमुख सल्लागार डॉ. इंद्रनील घोष हे होते. डॉ. मुकूंद शिंदे,



इंजि. सचिन कांबळे आणि इंजि. रणजीत जाधव हे सहनिमंत्रक तर डॉ. अतुल अत्रे हे आयोजक होते. या प्रशिक्षणाला संपूर्ण भारतातून प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. प्रशिक्षणाचे समन्वयक म्हणून डॉ. वैभव मालुंजकर, डॉ. प्रज्ञा जाधव, डॉ. निलम कोंडविलकर, इंजि. कल्पेश बोरसे आणि इंजि. ऋतुजा शिंदे यांनी काम पाहिले.

## कृषि विद्यापीठात जलसंधारण या विषयावर व्याख्यान सत्र संपन्न



**दि. २९ जून, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान तंत्रज्ञान केंद्राच्या प्रकल्पाअंतर्गत एक आठवड्याचे व्याख्यान सत्र जलसंधारण या विषयावर आयोजीत करण्यात आले होते. या सत्रासाठी विविध राज्यातील तज्ञ शास्त्रज्ञांना आमंत्रित करण्यात आले होते. या व्याख्यान सत्रासाठी आंतरराष्ट्रीय सिंचन आणि ड्रेनेज आयोग कमीशनचे उपाध्यक्ष आणि आंध्र प्रदेशचे आचार्य. एन. जी. रंगा कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. के. वाय. रेड्डी यांनी शेतीमधील आभासी पाणी आणि पाण्याचे ठसे समजून स्मार्ट जल व्यवस्थापन या विषयावर व्याख्यान दिले. गुजरात येथील जुनागड कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. एन. के. गोंटीया यांनी गुजरातमधील भूजल संचयन आणि व्यवस्थापनाचा आढावा या विषयावर व्याख्यान दिले. राजस्थान येथील उदयपूरच्या महाराणा प्रताप कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. पी. के. सिंग यांनी शाश्वत जलस्रोत व्यवस्थापनासाठी भूजल पुनर्भरणाचे कमी किमतीचे तंत्रज्ञान या विषयावर व्याख्यान दिले. मध्यप्रदेश येथील जबलपूर जवाहरलाल नेहरु कृषि

विश्वविद्यालयाचे कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. आर. के. नेमा यांनी स्थानिक माहितीवर आधारित भूजल संभाव्य क्षेत्र या विषयावर व्याख्यान दिले. ग्वाल्हेर येथील राजमाता विजयराजे कृषि विश्वविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. डी. एच. रानडे  यांनी पाणलोट क्षेत्रात मृदा आणि जलसंधारण उपक्रमांद्वारे विशिष्ट स्थळांचे कार्यक्षमतेने व्यवस्थापन करणे या विषयावर व्याख्यान दिले. पंजाबराव कृषि विद्यापिठातील कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एस. बी. वडतकर यांनी महामार्ग बांधणीतून जलसंधारणातून समृद्धी या विषयावर व्याख्यान दिले. या एक आठवड्याच्या व्याख्यानमालेचे संयोजक, कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनिल गोरंटीवार, सहसंयोजक डॉ. मुकुंद शिंदे आणि आयोजक डॉ. अतुल अत्रे होते. या व्याख्यानमालेसाठी विविध राज्याच्या विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी आणि विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. या व्याख्यानमालेचे समन्वयक म्हणुन डॉ. वैभव मालुंजकर, डॉ. प्रज्ञा जाधव आणि ऋतुजा शिंदे यांनी काम पाहिले.

## हाळगाव कृषि महाविद्यालयातर्फे जनजागृती व स्वच्छता सप्ताहाचे आयोजन



**दि. १३ जून २०२२.** पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी आता कृतीत उतरणे गरजेचे आहे. यासाठी तरुणांनी पुढे येवून पर्यावरणपूरक नवनविन उपक्रम सुरु करणे गरजेचे आहे. यामध्ये सायकलचा वापर, वृक्ष लागवड, माती संवर्धन, पक्षी संवर्धन असे विविध उपक्रम हाती घेणे गरजेचे आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांने आपल्या जन्मदिवसाच्या दिवशी किमान एक झाड लावून त्याचे संवर्धन केले पाहिजे असे प्रतिपादन कृषि महाविद्यालय हाळगावचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजनामार्फत व आझादी का अमृतमहोत्सव अंतर्गत पर्यावरण जनजागृती व स्वच्छता सप्ताह समारोप समारंभ संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयातील हरित सेनेचे सचिव श्री. बाळासाहेब डोंगरे उपस्थित होते. श्री. डोंगरे म्हणाले की आमच्या विद्यालयाच्या परिसरातील पक्षी संवर्धनासाठी विद्यालयाच्या हरित सेने मार्फत विविध उपक्रम राबविले जातात. यामध्ये पक्षी गणना, पक्षांचा निवारा, पाणी व्यवस्था करणे असे विविध उपक्रम राबविले जाते. प्लॅस्टिकमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याने जीवनात प्लॅस्टिक न वापरण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक कृषि महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. किर्ती भांगरे यांनी केले. सूत्रसंचालन विद्यार्थी महेश जाधव व मंजिरी पाटील यांनी केले. आभार स्नेहा कदम यांनी मानले.

## आदिवासी उपयोजना अंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन



**दि. १७ जून, २०२२.** सुत्रकृमीमुळे पिकांचे २१ टक्क्यांपर्यंत नुकसान होते. अशा या घातक सुत्रकृमीचे व्यवस्थापन जैविक पद्धतीने करता येते. त्यामध्ये फुले ट्रायकोडर्मा प्लस, पॅसिलोमायसिस लिलॅसिनस, निंबोळी पेंड इत्यादीचा वापर करून सुत्रकृमीचे उत्कृष्ट असे व्यवस्थापन करणे सहज शक्य आहे. झेंडूचे आंतरपीक घेऊनही सुत्रकृमीचे व्यवस्थापन करता येते. अशा पद्धतीने जैविक पद्धतींचा वापर करून सुत्रकृमीचे व्यवस्थापन केले तर निश्चितच पिकांच्या उत्पादनात वाढ होईल असे प्रतिपादन कृषि कीटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सी. एस. पाटील यांनी केले. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली व अखिल भारतीय समन्वित सूत्रकृमी संशोधन योजना, कृषि कीटकशास्त्र विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचाविण्यासाठी आदिवासी उपयोजना कार्यक्रमांतर्गत आदिवासी शेतकरी बांधवांना कृषि निविष्ठा व दैनंदिन वापरासाठी अवजारांचे वाटप कार्यक्रम अकोले तालुक्यातील शिळवंडी या गावात आयोजित करण्यात आला होता. यावेळी डॉ. पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना बोलत होते. याप्रसंगी सरपंच श्री. चहादु साबळे, उपसरपंच सौ. नंदा साबळे, कीटकशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. एस.टी. आघाव उपस्थित होते. यावेळी ८६ शेतकरी बांधवांना कृषि निविष्ठा व दैनंदिन वापरासाठी अवजारांचे वाटप करण्यात आले. यामध्ये बॅटरीवर चालणारे फवारणी पंप, वैभव विळा, कृषिदर्शनी आणि ट्रायकोडर्मा प्लस प्रत्येकी एक किलो याप्रमाणे साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पल्लवी पाळंदे यांनी तर आभार उत्तम साबळे यांनी मानले.

## शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**दि. १६ जून, २०२२.** महाराष्ट्र राज्यात ४५ लाख हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनचे पीक घेतले जाते. दरवर्षी सोयाबीनखालील क्षेत्र वाढत आहे. सोयाबीनमध्ये १८ टक्के तेलाचे व ४३ टक्के प्रथिनांचे प्रमाण असल्यामुळे सोयाबीन हे मुल्यवर्धनासाठी उत्तम असे पीक आहे. सोयाबीनपासून तेल आणि सोयाबीन पेंडीपासून विविध खाद्य पदार्थ बनविले जातात व यांना जागतिक बाजारपेठेत मोठी मागणी आहे. या बहुगुणी सोयबीनचे जागतिक बाजारपेठेच्या मागणीमुळे दरवर्षी सोयाबीनचे भाव वाढतच आहे. शेतकऱ्यांनी सोयाबीनमध्ये योग्य तंत्रज्ञानाबरोबरच मुल्यवर्धनाची जोड दिल्यास उत्पन्न व उत्पादनात वाढ होणे शक्य असल्याचे प्रतिपादन सोयाबीन पैदासकार डॉ. मिलिंद देशमुख यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचा शेतकरी प्रथम प्रकल्प आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने सोयाबीन व तूर उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम कानडगाव येथे आयोजीत करण्यात आला होता. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. देशमुख बोलत होते. योवळी तांभेरे गावचे सरपंच नितीन गागरे, कडधान्य सुधार प्रकल्पाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार कुटे, बियाणे संशोधन अधिकारी डॉ. विजय शेलार, प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे,

वर्ष :२, अंक क्रं. : १८, जून, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी



सहसमन्वयक डॉ. सचिन सदाफळ उपस्थित होते. यावेळी डॉ. नंदकुमार कुटे यांनी तूर उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. विजय शेलार यांनी बीज प्रक्रिया व तिचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. पंडित खर्डे यांनी केले. डॉ. नारायण मुसमाडे, डॉ. धनश्री सरनोबत व डॉ. रश्मी भोगे यांनी शेतकऱ्यांना बीज प्रक्रिया कशा पद्धतीने करायची याविषयी प्रात्यक्षिकाद्वारे माहिती दिली. सूत्रसंचालन डॉ. सचिन सदाफळ व आभार विजय शेडगे यांनी मानले. या कार्यक्रमाला तांभेरे, कानडगाव, चिंचविहिरे व कणगर या गावातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. किरण मगर, श्री. राहुल कोऱ्हाळे व श्री. बाबासाहेब अडसुरे यांनी परिश्रम घेतले.

## अंजीर व सिताफळ संशोधन केंद्रामार्फत प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन



**दि. १७ जून, २०२२.** अखिल भारतीय समन्वित अंजीर व सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी, आत्मा पुणे, आणि तालुका कृषि विभाग, शिरूर यांचे संयुक्त विद्यमाने सिताफळ पीक व्यवस्थापन व खरीप पूर्वतयारी नियोजन या विषयावर शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन मौजे पिंपरी दुमाला येथे करण्यात आले होते. यावेळी अखिल भारतीय समन्वित अंजीर आणि सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी येथील डॉ. प्रदीप दळवे यांनी सिताफळ बहार व्यवस्थापन तर सिताफळ रोग–कीड नियंत्रण या विषयावर डॉ. युवराज बालगुडे यांनी मार्गदर्शन केले. श्री. शशिकांत चिखले यांच्या सिताफळ बागेत शास्त्रज्ञांनी

प्रत्यक्ष भेट देऊन किड–रोग नियंत्रण याबाबत मार्गदर्शन केले तसेच पिठया ढेकणाच्या नियंत्रणासाठी झाडाच्या खोडास चिकटपट्टी लावण्याचे प्रात्यक्षिक तसेच झाडाची छाटणी व फळांची विरळणी कशी करावी याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. मंडळ कृषि अधिकारी श्री. अशोक जाधव यांनी योजनांविषयी सविस्तर माहिती दिली. कृषि पर्यवेक्षक श्री. संतोष जगताप यांनी कृषि विभागाच्या विविध योजना, श्री. अविनाश निर्मल यांनी सीताफळाच्या प्रक्रिया उद्योगांची गरज आणि शेतकऱ्यांचा होणारा फायदा याविषयी मार्गदर्शन केले. कृषि सहाय्यक श्री. अशोक जाधव यांनी ऊस पीक व्यवस्थापन व हुमणी नियंत्रण याबाबत मार्गदर्शन केले. श्री. अनिल देशमुख यांनी यांत्रिकीकरण, ठिबक सिंचन, नियंत्रित शेती याबाबत माहिती दिली, श्रीमती अर्चना जाधव यांनी मूग, सोयाबीन बिजप्रक्रीया, ऊगवणक्षमता व हुमणी प्रकाश सापळा याविषयी मार्गदर्शन केले. तसेच जैविक खताचा वापर यांबद्दल श्रीमती संध्या सांडभोर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सरपंच श्री. महेंद्र डोळस तसेच प्रगतशील शेतकरी आणि शेतकरी बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

## वाकसई येथे शेतकरी शास्त्रज्ञ मंचाची बैठक संपन्न



**दि. १० जून, २०२२.** कृषि तंत्रज्ञान पारायण अंतर्गत संत तुकाराम महाराज पादुका मंदिर, वाकसई, ता. मावळ, जिल्हा. पुणे येथे  कृषी संशोधन केंद्र, लोणावळा आणि महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाच्या सर्व सभासदांसाठी व परिसरातील महिला बचत गटांसाठी भात पिकात बीज प्रक्रिया व कीड व रोग व्यवस्थापन तसेच मधमाशापालन अशा विविध विषयांवर श्री. पद्माकर देसाई, उद्योजक, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली व श्री. दीपक हुलावळे, माजी पंचायत समिती सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली. यावेळी श्री. देसाई  यांनी शेतीला जोड उद्योगधंद्याचे महत्व विषद केले. डॉ. किरण रघुवंशी, भात रोग शास्त्रज्ञ, कृषी संशोधन केंद्र, लोणावळा यांनी भात शेतीमधील बीज प्रक्रिया आणि कीड व रोग  व्यवस्थापनेवर सविस्तर माहिती दिली तर श्री. बनसोडे, ज़िल्हा प्रमुख, मधूमक्षीकापालन यांनी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ कार्याबाबत माहिती दिली. तसेच श्री. शेवते यांनी मधूमक्षीकापालन याचे अर्थशास्त्र सांगितले तर श्री. पालवेचा यांनी मधूमक्षीकापालनाचे प्रात्यक्षिक दाखविले. यावेळी शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष नंदकुमार पदमुले व मंचाचे सभासद, आदिवासी महिला गट सभासद व शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमाची प्रस्तावना श्री. नंदकुमार पदमुले यांनी केली व श्री. महेंद्र आंबेकर यांनी आभार मानले.

मफुकृवि ई वार्ता
जून २०२२

## जुलै महिन्यातील कामांचा तपशील

### बागायती कापूस

- पीक तणविरहीत ठेवण्यासाठी कुळवाच्या पाळ्या द्याव्यात.
- रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव आढळून आल्यास बुप्रोफेझीन २५ एस. सी. या किटकनाशकाची २० मिली किंवा फ्लोनिकॅमीड ५० डब्ल्यु.जी. २ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- फुलकिडीचा प्रादुर्भाव जास्त दिसून आल्यास फिप्रोनील ५ एस.सी. ३० मिली किंवा डायफेन्युरॉन ५० डब्ल्यु.पी. १२ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- आकस्मिक रोग दिसून आल्यास १.५ किलो युरीया व १.५ किलो पालाश, १०० लिटर पाण्यात मिसळून प्रति झाडास १५० ते २०० मिली द्रावण झाडाच्या बुंध्यापाशी ओतावे.
- अति पावसामुळे (नैसर्गिकरित्या) पानेगळ होण्याची शक्यता असते, अशा वेळेस नॅप्थॅलिन ॲसेटिक ॲसीड (प्लॅनोफिक्स) १०० मिली प्रति ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- बीटी कापूस लागवडीनंतर ६० दिवसांनी नत्र खताचा तिसरा हप्ता (५० किलो नत्र प्रति हेक्टर) द्यावा.
- बिगर बीटी कपाशीसाठी लागवडीनतर ६० दिवसांनी नत्र खताचा तिसरा हप्ता (४० किलो नत्र प्रति हेक्टर) द्यावा.

### ऊस

- आडसाली ऊस लागवडीसाठी जमिनीची पूर्व मशागत करुन रानबांधणी आखणी पूर्ण करावी.
- मध्यम जमिनीत एक मीटर अंतरावर तर भारी जमिनीत १.२० मीटर अंतरावर सरी उताराच्या आडवी सोडावी.
- सरी सोडण्यापूर्वी प्रति हेक्टरी ३० टन चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट वापरा. ऊस लागणीच्या वेळी ४० किलो नत्र (८७ किलो युरिया), ८५ किलो स्फुरद (५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) व ८५ किलो पालाश (१४५ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) प्रति हेक्टरी सरी डोस पेरुन द्यावा.
- को.८६०३२ या जातीची लागण करतेवेळी ५० किलो नत्र (११० किलो युरिया ), १०० किलो स्फुरद (६२५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) व पालाश १०० किलो (१७० किलो म्युरेट ऑफ पोटॅश) प्रति हेक्टरी वापरावा.
- आडसाली लागण करताना को.८६०३२ व को.एम.०२६५ या शिफारशीत जातींचा वापर करावा.
- ऊस बेणे लागण करण्यापूर्वी खवले कीड, पिठ्या ढेकूण, लोकरी मावा, पांढरी माशी या किडीच्या नियंत्रणासाठी ३००मिली मॅलॅथिऑन ५०टक्के प्रवाही अथवा डायमेथोएट २६५मिली ३० टक्के प्रवाही आणि १०० ग्रॅ बावीस्टीन (०.१ टक्के) १००लिटर पाण्यात मिसळून त्यामध्ये १०मिनिटे बुडवावे आणि तेच बेणे परत १००लिटर पाण्यात १०किलो प्रति हेक्टरी ॲसेटोबॅक्टर डायअॅझोट्रॉपिकस आणि१.२५ किलो स्फुरद विरघळविणारे जिवाणु प्रति हेक्टरी याप्रमाणे मिसळून तयार केलेल्या द्रावणात ३० मिनिटे बुडवून ठेवावे व नंतर लागणीसाठी वापरावे, त्यामुळे नत्राच्या मात्रेत ५०% व स्फुरदाच्या मात्रेत २५% इतकी बचत होते.
- वाळवी, खोडकिड व मुळ पोखरणारी अळीच्या बंदोबस्तासाठी क्लोरोपायरीफॉस २० टक्के प्रवाही २.५ लिटर १००० लिटर पाण्यात मिसळून ऊस लागणीनंतर वापश्यावर सरीतून प्रति हेक्टरी ओतावे.
- ऊस लागणीकरीता उसाच्या एक डोळा अथवा दोन डोळा टिपरीचा वापर करावा.
- उसावरील पोक्का बोईंग या बुरशीजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यानंतर ०.३० टक्के मॅन्कोझेब या बुरशीनाशकाच्या ३ फवारण्या १२ दिवसाच्या अंतराने कराव्यात.
- हुणी किडीचा बंदोबस्त करण्यासाठी, हुणीग्रस्त ऊस पिकांची रोपे उपटावीत. जमिनीत मुळाशेजारी मिळालेल्या अळ्या

गोळा करुन रॉकेल मिश्रीत पाण्यात टाकून माराव्यात. तसेच दाणेदार फोरेट १० टक्के २५ किलो किंवा कार्बोफ्युरॉन ३ टक्के किटकनाशक हेक्टरी १५ किलो अथवा जैविक किडनाशक मेटॅरायझियम हेक्टरी २५ किलो याप्रमाणात शेणखतात मिसळून जमिनीतून द्यावे व हलके पाणी द्यावे.

**भात**

**पुर्नलागवड**

- रोपांच्या पुर्नलागवडीसाठी पारंपारीक पद्धतीने अथवा यंत्राच्या साह्याने चिखलणी करावी. हळव्या जातीची लागण पेरणीनंतर २१ते २५ दिवसांनी, निमगरव्या जातीची २३ते२७ दिवसांनी व गरव्या जातींची २५ ते ३० दिवसांनी करावी. एका चुडात २ ते ३ रोपे ठेवावीत.
- संकरित जातींसाठी एका चुडात फक्त १ ते२ रोपेच ठेवावीत.
- हळव्या जातींच्या रोपांची लावणी १५ द १५ सें.मी. तर निमगरव्या व गरव्या जातींची २० द१५सें.मी. अंतरावर करावी.
- सेंद्रीय खतांचा वापर चिखलणीच्या वेळी हेक्टरी १० मे.टन हिरवळीचे खत जमिनीत गाडावे. याकरीता धैंच्या अथवा ताग वापरावा. दुसरा मार्ग म्हणजे गिरीपुष्पाची शेताच्या बांधावर लागवड करावी. लागवडीनंतर दुसऱ्या वर्षापासून या झाडाचा पाला भात लावणीच्या ८ ते १० दिवस अगोदर शेतात गाडावा. गिरीपुष्पाची हिरवी पाने ३मे.टन प्रति हेक्टरी शेतात गाडल्यास नत्र खताकरता लागणाऱ्या खर्चात खूप बचत होते.
- रासायनिक खतांचा वापर भात लागवडीसाठी हेक्टरी १०० किलोग्रॅम नत्र, ५० किलोग्रॅम स्फुरद व ५० किलोग्रॅम पालाश या प्रमाणात रासायनिक खतांच्या मात्रेची शिफारस करण्यात आली आहे. हि खत मात्रा हळव्या जातींमध्ये लागणीच्या वेळी ५० टक्के नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश द्यावे. निमगरव्या व गरव्या जातींमध्ये लागणीच्यावेळी ४० टक्के नत्र आणि संपूर्ण स्फुरद व पालाश द्यावे. संकरीत जातींकरीता हेक्टरी १२० किलोग्रॅम नत्र, ५० किलोग्रॅम स्फुरद व ५० किलोग्रॅम पालाश या प्रमाणात रासायनिक खतांच्या मात्रेची शिफारस करण्यात आली आहे. ही खत मात्रा लागणीच्यावेळी ५० टक्के नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश द्यावे.
- जैविक खतांचा वापर विविध जैविक खते जशी निळे हिरवे शैवाल प्रति हेक्टरी २०किलोग्रॅम भात लागणीनंतर ८ते१० दिवसांनी शेतात टाकावे., अॅझोला (४ते ५ क्विंटल प्रति हेक्टर) चिखलणीच्यावेळी शेतात टाकावे.
- आंतरमशागत : पुर्नलागवड भात लागवड पद्धतीच्या भात शेतीमध्ये पुर्नलागवडीनंतर दोन ते तीन बेनण्या आवश्यक असतात. ५ ते ६ सें.मी. पाणी भात शेतात साठवून उत्कृष्टपणे तण नियंत्रण करता येते. रासायनिक तण नियंत्रणासाठी२० ग्रॅम मेटसल्फुरॉन मिथाईल १० टक्के + क्लोरोम्युरॉन इथाईल १० टक्के तयार मिश्रण ०.००४ किलो क्रियाशील घटक प्रति हेक्टरी ५०० लिटर पाण्यात पुर्नलागवडीनंतर १५ ते २० दिवसांत फवारावे व त्यानंतर ४५ व्या दिवशी एक खुरपणी करावी.
- पाणी व्यवस्थापन भात पिकाच्या योग्य वाढीकरिता व अधिक उत्पादनाकरिता भात खाचरात पाण्याची योग्य पातळी राखणे आवश्यक आहे. पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची पातळी पुढीलप्रमाणे असावी.
- रोप लागणीपासून रोपे स्थिर होईपर्यंत १ ते २ सें.मी.
- रोपांच्या वाढीच्या प्राथमिक अवस्थेत २ ते ३ सें.मी.
- अधिक फुटवे येण्याच्या अवस्थेत ३ ते ५ सें.मी.

वर्ष :२, अंक क्रं. : १८, जून, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

### कडधान्य

### मूग आणि उडिद

- पेरणीनंतर २०– २५ दिवसांनी पहिली व ३०– ३५ दिवसांनी दुसरी कोळपणी करावी.
- कोळपणीनंतर दोन रोपातील तण काढण्यासाठी गरजेनुसार खुरपणी करावी.

### तूर

- पेरणीनंतर १५–२० दिवसांनी विरळणी करुन कोळपणी करावी तसेच ३० दिवसांनी खुरपणी करावी व पीक तणविरहित ठेवावे.
- पेरणीनंतर ४५ दिवसांनी झाडांचा शेंडा ५ से.मी. वर खुडावा.

### नाचणी

- पेरणीची वेळ : जून/जुलै
- पेरणीची पद्धत : पुर्नलागण/पेरणी
- मार्करच्या सहाय्याने रेषा पाडणे
- बयाणे (कि.ग्रॅ/हे.) : पुर्नलागण – ३ किलो/हेक्टरी
- पेरणी पद्धत : ५ किलो/हेक्टरी
- लागवडीचे अंतर : ३० – १० सें.मी.
- पेरणीची खोली : २ सें.मी. पर्यंत
- नांग्या भरणे / विरळणी करणे
- **पुर्नलागणीची पद्धत** : गादी वाफ्यात तयार केलेली २५–३० दिवसांची रोपे वापरतात.
- रासायनिक बीजप्रक्रिया नाचणी पिकाची धुळवाफ पेरणी करीता प्रति किलो बियाण्यास ३ ते ४ ग्रॅम फॉलीडॉल भुकटी लावावी. रोग नियंत्रणासाठी प्रति किलो बियाणांस २.५ ग्रॅम कार्बनडेंझीम प्रक्रिया करावी.
- **बियाणे संस्करण** बियाणे पेरणीपुर्वी प्रति किलो बियाण्यास प्रत्येकी २५ ग्रॅम अझोस्पिरिलम ब्रासिलेन्स + स्फुरद विरघळणारे जिवाणू संवर्धकाची बिजप्रक्रिया करावी.
- खतमात्रा
- **रासायनिक खतमात्रा** : ६०:३०:३० किलो नत्र, स्फुरद, पालाश/हे.
- पेरणीच्यावेळी ३० किलो नत्र, ३० किलो स्फुरद, ३० किलो पालाश प्रति हेक्टर द्यावे.
- उप–पर्वतीय विभागातील हलक्या जमिनीत, अधिक तुपादन व आर्थिकफायद्यासाठी नाचणी पिकाची रोपलागण २०:४० से.मी. जोड ओळीत करून ५.० टन शेणखत प्रति हेक्टरी + शिफारसीत खत मात्रेच्या ७५ टक्के खत मात्रा (४५: २२.५ :०० नत्र: स्फुरद: पालाश किलो/ हेक्टरी) गोळी (ब्रिकेट) स्वरुपात रोप लावणीचे वेळी (२० सेमीच्या जोड ओळीत ३५ सेमी अंतरावर ५ ते ७ से.मी. खोलीवर २.७ ग्रमची एक गोळी) देण्याची शिफारस करण्यात आली आहे .

### सोयाबीन

- स्पोडोप्टेरा या पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी एक हेक्टर पिकात ५ कामगंध सापळेलावावेत. पेरणीनंतर २० ते २५ दिवसानी : पिवळा मोझॅक या रोगाच्या प्रतीबंधासाठी पांढऱ्या माशीचे नियंत्रण करणे गरजेचे असते. त्यासाठी पिकात पिवळे चिकट सापळे एकरी १० लावावेत. रोगाचा प्रादुर्भाव दिसू लागताच थायमिथोक्झाम २५ % डब्लू जी या किटकनाशकाची १०० ग्रॅम प्रती हेक्टरी फवारणी करावी. प्रादुर्भावग्रस्त झाडे आढळून आल्यास ती उपटून नष्ट करावीत.

**फळबाग व्यवस्थापन**

- **सिताफळ –** संकरीत जातीमध्ये कृत्रिम परागीभवन करावे. सिताफळावरील पिठया ढेकुण नियंत्रणासाठी जैवीक उपाय योजना करावी.
- **बोर –** नवीन फुटीच्या फांद्याची संख्या मर्यादीत ठेवुन झाडांना वळण देणे.
- **आवळा –** फुल धारणा व फळ धारणेच्या वेळी फळ पोखरणारी अळी व बी खाणाऱ्या भुंगेऱ्यांचे नियंत्रण करावे.
- **कागदी लिंबू –** पावसाचे जादा पाणी चराद्वारे बागेच्या बाहेर काढून द्यावे. आंबे बहाराच्या फळांची काढणी करावी. सिल्ला, मावा व पाने पोखरणारी अळी : डायमिथोएट २० मिली अथवा इमिडाक्लोप्रीड २.५ मिली/१० लि. पाणी याप्रमाणे फवारणी करावी. कँकर / खैऱ्या रोग : स्ट्रेप्टोसायक्लीन १ ग्रॅम + कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम प्रति १० लि. पाणी शेंडेमर : कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम/ १० लि. पाणी

**भाजीपाला व्यवस्थापन**

- उन्हाळी वेलवर्गीय भाजीपाला पिकांची काढणी करावी.
- उन्हाळी वांगी, मिरची, टोमॅटो पिकाची काढणी करावी.
- खरीप हंगामातील भाजीपाला पिकाचे लागवडीसाठी रान बांधणी करावी.लागवडीचे वेळी शेणखताचा वापर करावा.
- रासायनीक खत मात्रेच्या ५० टक्के नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश लागवडीचे वेळी द्यावे.
- टोमॅटोचे ३ ते ४ आठवडे कालावधीचे रोप लागवडीस वापरावे.
- वांगी व मिरची पिकाचे सहा आठवडे कालावधीचे रोपे लागवडीसाठी वापरावे.
- लागवडीपूर्वी टोमॅटो, वांगी, मिरची, फ्लॉवर व कोबी रोपांची मुळे किटकनाशक, बुरशीनाशक तसेच जीवाणू खताचे द्रावणात बुडवावे.
- कांदा पिकाचे रोपवाटीकेतील रोपांचे किड व रोगापासून संरक्षण करावे.
- कांदा पिकाचे लागवडीसाठी शेत तयार करावे.
- फ्लॉवर व कोबीचे सहा आठवड्याचे रोपे लागवडीस वापरावे.
- खरीप हंगामातील वेलवर्गीय भाजीपाला पिकांची लागवड करावी उदा. दुधी भोपळा, कारली, दोडका, घोसाळी, तांबडा भोपळा इ.
- खरीप भेंडी व गवार पिकांची लागवड करावी.
- पिकामध्ये पाणी साचू देऊ नये.

**आले**

- आंतरपिके जसे कोथिंबीर, झेंडू, मिरची, तूर, गवार यांची लागवड करावी.
- आले उत्पादनात वाढ होण्यासाठी तसेच आल्यामधील तंतुचे प्रमाण कमी करण्यासाठी २ टक्के युरिया आणि ४०० पीपीएम प्लॅनोफिक्सचे मिश्रण ६० आणि ७५ व्या दिवशी लागवडीनंतर फवारावे.
- आले पिकांत फुटव्यांची संख्या वाढण्यासाठी २०० पीपीएम इथरेलची ७५ व्या दिवसां पासून १५ दिवसांच्या अंतराने ३ फवारण्या कराव्यात.
- जमिनीच्या मगदूराप्रमाणे पाण्याचे नियोजन करावे.
- पावसाचे पाणी साचू देवू नये. पाण्याचा तात्काळ निचरा करावा.

वर्ष :२, अंक क्रं. : १८, जून, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

- कंदमाशीचे नियंत्रण करावे: आले पिकास कंदमाशीसारख्या किडीचा मोठा उपद्रव होतो. या किडीची माशी डासासारखी पण आकाराने मोठी व काळसर रंगाची असते. माशीचे पाय शरीरापेक्षा लांब असतात. दोन्ही पंख पातळ व पारदर्शक असून त्यावर राखी रंगाचे ठिपके असतात. अंडी पांढरट रंगाची असतात. अळी पिवळसर असून त्यांना पाय नसतात. या किडीच्या अळया उघडया गड्डुयामध्ये शिरुन त्याच्यावर उपजिवीका करतात.

**पशुसंवर्धन**

- पावसाळयात जनावरांच्या पिण्याच्या टाक्यामध्ये पावसाचे वाहत आलेले पाणी जाणार नाही हयाची दक्षता घ्यावी. पाण्याच्या हौदांची नियमीत स्वच्छता करुन चुना लावून घ्यावे.
- गायी म्हशी नुकत्याच प्रसव झाल्या असल्यास नवजात वासरांची विशेष दक्षता घेणे अत्यंत गरजेचे आहे. नवजात वासरांना कोरडया जागेवर, उबदार वातावरणात ठेवावे.
- वासरांना त्याच्या वजनाच्या १० टक्के इतका चीक दिवसातून ३ ते ४ वेळा विभागुन तीन दिवस द्यावा. त्यामुळे त्यांच्या मध्ये रोगप्रतिकार शक्ती वाढेल.
- संपूर्ण पावसाळयात स्तनदाहाचे प्रमाण वाढते. त्यासाठी दुध काढण्यापूर्वी व काढल्यानंतर जीवाणूनाशक द्रावण्याची कासेवर फवारणी करावी किंवा सडे द्रावणात बुडवावीत.

**अवजारे**

- विद्युत मोटारचलित फुले औनस्पषधी ती बियाणे कवच फोडणी यंत्र
- हिरडा व बेहडा इ. कवच फोडणीसाठी उपयुक्त.
- एक अश्वशक्ती सिंगल फेज विद्युत मोटारचलीत यंत्र.
- कार्यक्षमता १२५ ते १५० किलो ग्रॅम/तास.

**प्रकाशक** : **डॉ. शरद गडाख**
संचालक, विस्तार शिक्षण

**प्रमुख संपादक** : **डॉ. पंडित खर्डे**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र

**सहसंपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र
**श्री. सुनिल राजमाने**
कृषि सहाय्यक, प्रसारण केंद्र

**डिझाईनर** : **श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र

**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २४७७/२०२२**